एस.सी. सी. क्रं. २६६/२०२२
सरकार वि.सुभाष बळे
निशाणी १८

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**
**साक्षीदाराचे नाव – कल्याण तुकाराम वानखेडे**
**वय. ६१ वर्ष, उपजिवीका- सेवानिवृत्त.**
**रा. जळगाव.**

**सरतपास शपथेवर सरकारी पक्षातर्फे श्री. पी.आर.कुर्लेकर वकील .**

**१.** दि.२७.०१.२०२१ रोजी मी पिशोर पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना तपासी अंमलदार नागलोत यांनी माझ्या ताब्यात जप्त झालेले भिंगरी संत्राच्या देशी दारुच्या बाटल्यांमधुन नमुन्याकरीता सिल केलेली एक बाटली माझ्याकडे दिली. त्यामध्ये आरोपी सुभाष कैलास बळे , असे होते.

**२.** नियमप्रमाणे मी ते नमुना औरंगाबाद येथील प्रयोगशाळे मध्ये जमा केले. त्या संदर्भातील पोचपावती तपासी अंमलदार नागलोत यांच्याकडे दिली. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. ते तेच असुन त्यावर तपासी अंमलदार नागलोत यांची सही आहे. ती मी ओळखली आहे. पोचपावती म्हणुन औरंगाबाद येथील प्रयोगशाळेच्या संबंधीत अधिका-याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येत आहे. माझे तपासटिपन घेण्यात आले होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे श्री.व्ही. के. मोहीते वकील यांच्याद्वारे**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, मी त्यादिवशी ब-याच प्रकरणातील मुददेमाल प्रयोग शाळेत घेउन गेलो होतो. निशाणी १८ वरील जप्त मुददेमालाचे बॅच क्रमांक, उत्पादन वर्ष नमुद नाही. मी छाप्याच्या वेळेस नव्हतो. प्रत्यक्ष घटनेबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर

खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
VIJAYA NARAYANRAO
KATKAR
Date: 2024.11.14
10:54:53 +0530

**(काटकर विजया एन.एस.)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**दिनांक– १३.११.२०२४** **(न्यायालय क्र.३), कन्नड.**